# शासकीय सफाई कामगारांच्या मुलामुलींच्या निवासी शाळेचा निकाल १०० टक्के

पुणे, दि. १(दत्ता सूर्यवंशी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे संचालित शासकीय सफाई कामगारांच्या मुलामुलींची निवासी शाळा येरवडा, पुणे या शाळेचा २०१९-२० वर्षाच्या एस.एस.सी.चा १०० टक्के निकाल लागला आहे.

यावर्षी शाळेत खारवे सूरज लक्ष्मण या विद्यार्थ्याने ८८.२० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. घुले अतुल प्रकाश याने ८६.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, ब्राह्मणे स्वप्नील दीपक ८५. ६० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळविला आहे. एकूण २४ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थी उच्च श्रेणीत तर ९ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत आणि चार विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उतीर्ण झाले.

या शाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत एकूण ३२० अनु सूचित जाती जमातीमधले गरीब व होतकरू मुले असून त्यांना बार्टी चया माध्यमातून निवासाची व्यवस्था, कपडे, शैक्षणिक साहित्य, भोजन, आरोग्य विषयक सुविधा पुरविल्या जातात संस्थेचे महासंचालक कैलाश कणसे व निबंधक यादव गायकवाड यांनी विद्यार्थी वेळोवेळी मार्गदर्शन केले.तसेच प्रकल्प संचालक भीमराव पारखे, मुख्याध्यापिका जयश्री चेंडके, सर्व शिक्षक व शिक्षक्तेर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान विद्यार्थ्यांना मिळाले. शाळेचा १०० टक्के निकाल लागल्याने विद्यार्थी आणि शाळेचे सर्व स्थरातून कौतुक होत आहे.

11:56 4G VOLTE 34%
epaper.esakal.com/Flash



पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी अतुल खंडगावकर आदी.



लेबर कॉलनी चौकात अभिवादन करताना अशोक बोर्डे, बाबासाहेब आस्वार, सुमित्रा खंडारे आदी.

पूर्णाकृती
करण्यात
अनुराग
त मिश्रा,
वाघरे,
होते.

वतीने
राठवाडा
कासाहेब
मिलिंद
न डुमणे,
दादाराव
व दाणे,
त आदी

इंडिया
अन्नधान्य
वडगाव
सिडको,
करण्यात
केट वाटप

करण्यात आले. मिलिंद मोकळे, सुनील शिंदे, शहराध्यक्ष अमोल मगरे, राहुल खरात, दीपक साळवे, चेतन लांडगे, प्रकाश त्रिभुवन, आतिष खरात आदी उपस्थित होते.

### भारतीय दलित कोब्रा संघटना

भारतीय दलित कोब्रा संघटनेच्या वतीने लेबर कॉलनी चौकात अभिवादन करण्यात आले. मराठवाडा अध्यक्ष अशोक बोर्डे यांच्या हस्ते पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. बाबासाहेब अस्वार, आनंद बोर्डे, विनायक वाघुले, सागर बोर्डे, नीलेश गायकवाड, सुमित्रा खंडारे, राजश्री साठे, मनीषा महालगे, संगीता पाटोळे आदी उपस्थित होते.

### वाल्मीकी महापंचायत

अखिल भारतीय वाल्मीकी महापंचायतीच्या वतीने लेबर कॉलनी चौकात अभिवादन करण्यात आले. यावेळी राजपाल सौदे, अर्जुन ढोगले, शांतीलाल कसारे, सुनील चव्हाण, मालती अव्हाड, मुकेश पारचा, राजपती सारसर, राहुल सारसर, सुरेश नाडे, राजू शेजूळ आदी उपस्थित होते.

### 'बार्टी'तर्फे अभिवादन


औरंगाबाद : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने आयोजित अण्णा भाऊ साठे विशेष अभिवादनपर कार्यक्रम ऑ झूम ॲपच्या माध्यमातून घेण्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त तहसीलदार तथा दलित चळवळीचे कार्यकर्ते रामचंद्र शेलार उपस्थित होते.

प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांनी समाजकल्याण व बार्टी राबवीत असलेल्या योजनांविषयी माहिती दिली. अशा प्रकारचे ऑनलाइन प्रबोधनात्मक २७ कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्यात एक ते पाच ऑगस्टदरम्यान मोठ्या उत्साहात राबविण्यात येत आहेत. यासाठी रविकुमार कळसाईतकर, सुभाष राठोड, स्नेहलता मगरे, सुषमा उके, पूनम कुमावत आदी पुढाकार घेत आहेत.


---

ल सुवर्णपदक
लने जागतिक
मिळवला

मुलींचे प्रशिक्षक म्हणून काम केले होते. खेळाडू म्हणून मितालीच्या नावे दोन जागतिक विजेतेपदांची नोंद आहे. तिने जागतिक



# बार्टी संस्थेच्या वतीने मिळाली ऑनलाईन व्याख्यानाची संधी



भिवादन
प्रदेश

सट

◆ कळंब : कोरोनामुळे एकत्र येण्यास प्रतिबंध असला तरी यावरही 'मात्रा' शोधत शनिवारी बार्टी संस्थेने साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑनलाईन साजरी केली. शिवाय सहभागी श्रोत्यांना याद्वारेच व्याख्यान श्रवण करण्याची संधी उपलब्ध करून दिली.

◆ कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी फिजिकल डिस्टन्स पाळणे आवश्यक ठरत आहे. यामुळे सार्वजनिक कार्यक्रमावर मर्यादा आल्या आहेत. विविध सण, राष्ट्रीय कार्यक्रम करण्यावर बंधने आली आहेत. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे १ ऑगस्ट २०१९ ते ३१ जुलै २०२० हे जन्मशताब्दी वर्ष होते. परंतु, कोरोनामुळे नियोजित कार्यक्रम करणे अशक्य झाले आहे.

◆ यामुळेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी पुणे) कळंब तालुका शाखेने आण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्याचा निर्णय घेतला. यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार समतादूत अर्चना आण्णासाहेब रणदिवे यांनी ऑनलाईन जयंती सोहळा व व्याख्यानाचे आयोजन केले.

◆ यानुसार एका ॲपवर लिंक देण्यात आली. शनिवारी यास चांगला प्रतिसाद मिळाला. राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून शंभरावर लोक यात सहभागी झाले होते. प्रारंभी साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संतोष नरसिंगे तर प्रमुख पाहूणे म्हणून खेर्डा येथील सरपंच विक्रम भंडारे, पवन कोकाटे, डॉ. सूर्यभान शेंडगे यांची उपस्थिती होती.

◆ यावेळी महाराष्ट्र अंनिसचे पदाधिकारी तथा रायगड येथील राज्यस्तरीय आदर्श शिक्षक तुकाराम शिंदे यांचे आण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे व्याख्यान झाले. त्यांनी आण्णा भाऊ यांचा जीवनप्रवास, साहित्यसंपदा यावर प्रकाश टाकला. स्मशानातील सोनं ते 'माझी मैना' इथपर्यंतच्या आण्णा भाऊ यांच्या साहित्यामधील व्यक्तिरेखा आपल्या शब्दातून हुबेहुब साकारल्या. शेवटी बार्टीच्या तालुका समन्वयक अर्चना रणदिवे यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची धुरा अण्णाभाऊ साठेनीं जपली – रघुनाथ गायकवाड

नायगांव (प्रतिनिधी) – भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची धुरा अण्णा भाऊ साठे यांनी जपली असुन अशा थोरांचे विचार आजच्या पिढिने जपण्याची गरज आहे, असे प्रतिपादन रघुनाथ गायकवाड यांनी केले. दि.१ ऑगस्ट रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणेच्यावतीने नांदेड जिल्हा तालुका नायगांवचे समतादुत दिलीप सोंडारे यांनी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पान ३ वर ➢➢

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या....**यांनी लिहिलेली अनेक कादंबरी नाटके शाहीरी ही पाहूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर अण्णा भाऊना म्हणाले होते माझे शंभर भाषणे आपली एक शाहीरी ही समाजात परिवर्तन घडवतील.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरीत होऊन अण्णा भाऊनी आपले आयुष्य समाजासाठी घालवली आहे तेव्हा आपण त्यांच्या कार्याचा वसा जपण्याची गरज आहे अशी खंत व्यक्त केली. कार्यक्रमांचे प्रास्ताविक समतादुत दिलीप सोंडारे यांनी केले. टेंभुर्णी आणि किनाळा येथे अण्णा भाऊ च्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हा प्रकल्प आधीकारी सुजाता पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे कार्यक्रम चालू करण्यात आला.आभार समतादुत बालाजी गिरी (अकोट.जि.अकोला )यांनी मानले.

सदरील ऑनलाईन आणि लाईव्ह कार्यक्रम बार्टी चे महासंचालक कैलास कणसे, निबंधक यादवराव गायकवाड, समतादुत प्रकल्पाच्या मुख्य संचालीका प्रज्ञा वाघमारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

# बीड जिल्ह्यात बार्टी मार्फत आण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम

● बाळकडू : व्यंकटेश जोशी

बीड : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व इतर शासनाचे विभाग यांच्याअंतर्गत अनुसूचित जातीच्या व तळागाळातील वंचित घटकांच्या सामाजिक, आर्थिक व मानसिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविणे त्यांना प्रत्यक्षलाभ कसा मिळेल याविषयी जनजागृती करणे हे अतिशय महत्वाचे कार्य समतादूत मनुष्यबळामार्फत करण्यात येते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व राज्य घटनेतील नमूद न्याय, स्वतंत्र्य, समानता बंधुत्व, समानता, इ. मुलभुत तत्व जन सामान्यांपर्यंत पोहोचविणे, सामाजिक सलोखा व बंधुभाव निर्माण करण्यासाठी तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ बाबत जाणीव - जागृती करणे.

समाजात जातिय दुर्भावना असू नये आणि जातीय दुर्भावना निर्माण करणाऱ्या कारणांचा शोध घेऊन त्या कारणांचे निर्मुलन व्हावे या साठी जनजागृती करणे हे अतिशय महत्वाचे कार्य समतादूत मनुष्यबळामार्फत करण्यात येते.

जातीय दुर्भावना नष्ट करणे समाजिक न्याय, समता, बंधुत्वासाठी व राज्य घटने मधील नमूद न्याय, स्वातंत्र्य, एकात्मता, समानता ही मुलभूत तत्वे जनते मध्ये पोहोचविणे/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व इतर शासकीय विभागाच्या अनुसूचित जातीच्या जनतेसाठी असणाऱ्या योजनांचा प्रचार व प्रसार करणे तसेच त्यांना योजनेचा हक्क मिळवून देणे/ अनुसूचित जातीतील सामाजिक, आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील सामान्य जनतेला त्यांचा मुलभूत अधिकार/हक्क असलेल्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे मुख्य काम समतादूत करतात / शासकीय विभागाच्या अनुसूचित जातीच्या जनतेसाठी विकासात्मक योजनांचा प्रचार व प्रसार करणे, हे कार्य समतादूत मनुष्यबळामार्फत करण्यात येते.



लॉकडाऊन कालावधीत समतादुताने कोरोना विषाणू संदर्भात सर्व सामान्यांना जनजागृती केली,मोफत अन्न किट चे वाटप,सामाजिक अंतर पाळणे,आरोग्य कर्मचारी / पोलीस कर्मचारी यांचा आदर राखण्यासंदर्भात व शासनाचे सर्व आदेश पालन करण्या संदर्भात विविध सामाजिक संघटनांच्या साहायाने सर्व सामान्य जनतेचे समुपदेशन केले.

कोरोना विषाणू प्रादुर्भाव असताना पण महाराष्ट्रात बार्टीच्या समतादुत प्रकल्पातील समतादुत एम.पी.एस.सी. पूर्व तयारी साठी ऑनलाईन नोंदणी साठी खूप महत्व पूर्ण काम केले आहे.त्याच बरोबर अनुसूचित जातीतील ५९ जातींचे सर्वे क्षण पूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले.

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त बार्टी च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात ऑनलाइन प्रबोधन आयोजित केले होते. अंबाजोगाई तालुक्यातील समतादूत जोशी व्यंकटेश यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक श्री. अशोक पालके यांनी ऑनलाइन प्रबोधन करत अण्णाभाऊसाठे यांचा जीवनप्रवास त्यांच्या साहित्या विषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.बाळासाहेब कांबळे हे होते. कार्यकर्माचे सुत्रसंचलन जोशी व्यंकटेश यांनी केले. या कार्यक्रमास नागरिक ऑनलाइन घरी बसून सहभागी झाले होते.

मा. धनंजय मुंडे मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहा. विभाग, मा. विश्वजित कदम, राज्यमंत्री ( सा. न्या. व. वि. स. वि) , मा. पराग जैन - नैनुटीया (भाप्रसे) प्रधान सचिव ( सा. न्या. व. वि. स. वि) , मा. कैलास कणसे महासंचालक बार्टी, यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक व बीड जिल्हा समतादूत प्रकल्प अधिकारी श्री.सर्वेश्वर कोठुळे यं... ऑनलाईन माध्यमा... जयंती कार्यक्रम रा...

महत्त्वाचे वृत्त

## अंधुरेच्या पत्नीची याचिका निकाली

## शेतकऱ्यांच्या विकासासाठी शास...

## बार्टी समतादुतांच्या वतीने तीन दिवसीय ऑनलाईन जयंती प्रबोधन

**हिंगोली** (कार्यालय प्रतिनिधी) - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी समतादुत हिंगोलीच्या वतीने साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जन्मशताब्दी जयंती निमित्त ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. कोरोना काळातही महापुरुषांचा आदर्श समाजासमोर तेवत ठेवण्यासाठी बार्टीचे समतादुत तत्पर असून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी जयंती १ ते ३ ऑगस्ट या दरम्यान तीन दिवस ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आले. याचाच एक भाग म्हणून १ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता महामानवाच्या प्रतिमेचे पुजन करून ऑनलाईन जयंती प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलिस निरीक्षक रेखा शहारे ह्या उपस्थितीत होत्या. प्रमुख वक्ते म्हणून पत्रकार व उत्कृष्ट खेळाडु मिलिंद ठोके यांनी अण्णाभाऊच्या जिवन साहित्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समतादुत सुरेश पठाडे यांनी केले. प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोवंदे यांनी केले. तर प्रफुल्ल पट्टेबहादुर यांनी उपस्थितांचे आभार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या...

यांची जयंती  ऑनलाईन साजरी करण्यात आली. तेव्हा प्रमुख वक्ते म्हणुन  मुंबई येथील शिक्षक रघुनाथ गायकवाड यांना पाचारन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी ऑनलाईनवर मार्गदर्शन करताना वरील उद्गार काढले. मातंग समाजासाठी बार्टी मार्फत अनेक विकास योजना राबविण्यात आलेल्या आहेत. समतादुत दिलीप सोंडारे प्रत्येक गावागावात पोहचले असुन मागासवर्गीय जातींना विकासाच्या प्रवाहात आनले आहेत. तेव्हा बार्टी ने केलेल्या कार्यक्रमाची दखल सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी नागरिकांनी घेतली पाहिजे आणी आपला विकास केला तरच ख-या अर्थाने अशा थोरांची जयंती साजरी करण्यामागील उदेश साध्य होईल. अण्णा भाऊ साठे यांनी लिहलेली अनेक कादंबरी, नाटके, शाहीरी पाहूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अण्णा भाऊना म्हणाले होते की, माझे शंभर भाषणे आपली एक शाहीरी ही समाजात परिवर्तन घडवतील .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरीत होऊन अण्णा भाऊनी आपले आयुष्य समाजासाठी घालवले आहे. तेव्हा आपण त्यांच्या कार्याचा वसा जपण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त कैले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक समतादुत दिलीप सोंडारे यांनी केले. टेंभुर्णी आणी कीनाळा येथे अण्णा भाऊच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हा प्रकल्प आधीकारी सुजाता पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे कार्यक्रम चालू करण्यात आला. आभार समतादुत बालाजी गिरी (अकोट.जि.अकोला) यांनी म ानले.

सदरील ऑनलाईन आणि लाईव्ह कार्यक्रम बार्टीचे म हासंचालक कैलास कणसे, निबंधक यादवराव गायकवाड, समतादुत प्रकल्पाच्या मुख्य संचालीका प्रज्ञा वाघमारे  यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची धुरा अण्णाभाऊ साठेंनी जपली-गायकवाड




नायगांव,(प्रतिनिधी)- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची धुरा अण्णाभाऊ साठे यांनी जपली असून अशा थोरांचे विचार आजच्या पिठीने जपण्याची गरज आहे असे प्रतिपादन रघुनाथ गायकवाड यांनी केले. दि.१ ऑगस्ट रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणेच्या वतीने नांदेड जिल्हा तालुका नायगांव चे समतादुत दिलीप सोंडारे यांनी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती बार्टीच्या वतीने ऑनलाईन साजरी करण्यात आली तेव्हा प्रमुख वक्ते म्हणून मातंग समाजातील तरूण मुंबई येथील शिक्षक रघुनाथ गायकवाड सरांना पाचारन करण्यात आले त्या वेळी त्यांनी ऑनलाईन वर मार्गदर्शन करताना वरील उद्‌गार काढले.

मातंग समाजासाठी बार्टीमार्फत अनेक विकास योजना राबविण्यात आलेल्या आहेत. समतादुत दिलीप सोंडारे प्रत्येक गावागावात पोहचले असून मागासवर्गीय जातींना विकासाच्या प्रवाहात आनले आहेत. तेव्हा बार्टीने केलेल्या कार्यक्रमाची दखल सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी नागरिकांनी घेतली पाहिजे आणि आपला विकास केला तरच खऱ्या अर्थाने अशा थोरांची जयंती साजरी करण्यामागील उदेश साध्य होईल. अणणाभाऊ साठे **पान ४ वर**

# 'बार्टी'ची अण्णा भाऊंना अनोखी आदरांजली

जनप्रवास प्रतिनिधी

● **सांगली :** जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव असा संदेश देणारे आणि फकीरा ही अत्यंत नावाजलेली कादंबरी बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करणारे साहित्यातील बादशहा, साहित्याचे सम्राट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची शंभरावी जयंती आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी पुणे विभाग यांच्यावतीने अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आले.

कोरोना साथीच्या या परिस्थितीतही महामानवांना अभिवादन करण्याची बार्टीची परंपरा अखंडित ठेवीत पुणे विभागाच्या वतीने ऑनलाइन व्याख्यानाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडून शोषितांच्या आवाजाला क्रांतीची फुंकर मारणाऱ्या अण्णा भाऊ साठेंची जयंती मोठ्या दिमाखात पार पडले.



आपल्या पहाडी आवाजातून क्रांतीची मशाल शाहिरीतुन मांडणारी शाहीर शीतल साठे यांच्या मानवंदनापर गीताने जयंतीची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मातंग महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेशचंद्र राजहंस होते. व्याख्यानाचे प्रमुख वक्ते डॉ. नामदेव कस्तुरे व प्रा. डॉ. शरद गायकवाड हे होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती सोलापूरचे मातंग समाजाचे अध्यक्ष युवराज पवार व संदेश भंडारे यांची होती.

ऑनलाइन व्याख्यानाच्या वेळी बोलताना डॉ. नामदेव कस्तुरे यांनी महामानवांना ऑनलाइन व्याख्यानातून अभिवादन करण्याची बार्टीची संकल्पना ही कौतुकास्पद असून समतादूत हा बार्टीचा मुख्य कणा असल्याचे गौरवोद्गार काढले. माणूस, माणुसकी आणि मानवतावादाच्या सिद्धांतावर आधारित मानवी कल्याणासाठीचे लेखन अण्णाभाऊंनी केले होते असे उद्गार डॉ. शरद गायकवाड यांनी व्यक्त केले. ये आझादी झुठी है, देश कि जनता भुकी है असा नारा देऊन खऱ्या अर्थाने लोकशाही स्वातंत्र्याची आस अण्णा भाऊंची होती असे मत राष्ट्रीय मातंग महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेशचंद्र राजहंस यांनी व्यक्त केले.